# सीप्झ मेट्रो स्थानकात दुसऱ्या टप्प्याचे भुयारीकरण

## ७.७ किमी लांबीचा टनेल; 'वैनगंगा २' टनेल बोअरिंग मशीनद्वारे काम पूर्ण

प्रतिनिधी
मुंबई

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनअंतर्गत 'मुंबई मेट्रो लाईन ३'च्या सातव्या पॅकेजमधील सीप्झ स्थानकावर भूयारीकरणाचा दुसरा टप्पा संपन्न झाला आहे. 'वैनगंगा २' या टनेल बोअरिंग मशीनने सारीपुतनगर लाँचिंग शाफ्ट येथून काम सुरू केले. ५६८ मीटर इतके भुयारीकरण अवघ्या १२५ दिवसात २५० पेक्षा अधिक अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी पूर्ण केले.

'वैनगंगा २' या टीबीएमची रचना भूगर्भातील कठीण खडक भेदून भूयारीकरण करण्यासाठी केलेली आहे. ९२ मीटर लांबीची 'वैनगंगा २' प्रतिदिन १० ते १३ मीटर इतके भूयार तयार करते. भविष्यात मुंबई मेट्रो ३ मार्गिका



छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, आरे कॉलनी त्याचप्रमाणे वर्सोवा–अंधेरी–घाटकोपर मेट्रो १ मार्गिका आणि स्वामी समर्थनगर–जोगेश्वरी–कांजुरमार्ग–विक्रोळी मेट्रो ६ मार्गिका व सीप्झ, एमआयडीसीसारख्या व्यावसायिक क्षेत्राला जोडली जाणार आहे. एमएमआरसीने आतापर्यंत १५ किलोमीटर इतके भूयारीकरण पूर्ण केले आहे. यासाठी एकूण १० टीबीएम शाफ्टमधून तब्बल १७ टीबीएम मशीन कार्यरत आहेत. या प्रकल्पामध्ये कार्यरत असलेल्या प्रत्येकाच्या अथक परिश्रमामुळे भूयाराचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यास आपल्याला यश प्राप्त झाले आहे. एल अँड टी आणि शांघाय टनेल इंजिनिअरिंग हे पॅकेज ७ एमआयडीसीमार्गे मरोळ नाका ते सीप्झ या स्थानकांमधील भूयारीकरणाचे काम करते. या पॅकेजमधील एकूण भूयाराची लांबी ७.७ किमी असून या भूयारीकरणातून एकूण ११ लाख क्यूबिक मीटर इतकी माती उत्खनीत होणार असल्याचे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.